मा. कोर्ट कामी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नवापूर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0299 **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/04/2024 12:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शुक्रवार
      **Time Period (कालावधी):** पहर 7
      **Date From (दिनांक पासून):** 26/04/2024
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/04/2024
      **Time From (वेळेपासून):** 20:13 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 20:13 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 27/04/2024 **Time (वेळ):** 10:13 बजे
   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 010
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/04/2024 11:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      पश्चिम, 7 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** गुजरात कडुन महाराष्ट्र सीमा,तपासनी नाका नवापुर, ता नवापुर जि नंदुरबार

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दिपक शेका गायकवाड

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हरिष्चंद्र नारायण म्हात्रे चाळ,रुम नं 2, सेक्टर 20, बेलापूर,नवी मुंबई , नवापूर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हरिष्चंद्र नारायण म्हात्रे चाळ,रुम नं 2, सेक्टर 20, बेलापूर,नवी मुंबई , नवापूर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | खाजगी इसम श्री. इरसाल हन्नान पठाण | | | 1. लाखाणी पार्क, नवापुर, नवापुर, नवापूर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 27/04/2024

मी, दिपक थेका गायकवाड, वय - 39 वर्षे, व्यवसाय-ट्रक चालक, राहणार - हरिष्चंद्र नारायण म्हात्रे चाळ, रुम नं. 2, सेक्टर 20, बेलापूर, नवी मुंबई असा असून, समक्ष हजर राहून अशी फिर्याद देतो की,

मी श्री. मनोज दत्तात्रय बाईत यांचे कंपनी मनोज टेंपो सर्विस, बेलापुर, नवी मुंबई च्या आयषर टेम्पो क्र. एमएच 43 बीपी 6054 वर चालक म्हणून मागील 20 वर्षांपासून काम करीत आहे.

आमची कंपनी नवी मुंबई वरून फळभाज्या धुळे, जळगाव, नंदुरबार मार्गे गुजरात राज्यामध्ये पोचविण्याचे काम करते. मी आमचे कंपनीची गाडी घेवून गुजरात राज्यामध्ये जातांना तसेच गुजरात राज्यामधून महाराश्ट्रामध्ये येत असतांना, नवापुर, जि. नंदुरबार येथील आरटीओ चेक पोस्ट येथे गाडी थांबविली जाते. तेथे माझे गाडीचे वजन होवून, वजन काटयाची 112 रू. ची पावती दिल्यानंतर, गाडी चेकपोस्ट वरून बाहेर पडण्याआधी तेथे असलेल्या आरटीओच्या इमारतीकडे थांबवावी लागते. तेथे आरटीओ चे साहेब लोक प्रत्येक गाडीकडून 50 ते 100 रू. इंट्री फी म्हणून घेतात. त्याची ते कोणतीही पावती देत नाहीत. जर एखादया गाडी वाल्याने इंट्री फी न देता निघण्याचा प्रयत्न केला तर त्या गाडीवाल्याला तेथे हजर असणारे 4 ते 5 खाजगी लोक अडवतात व जबरदस्तीने इंट्री फी घेतात.

माझे गाडी मालक श्री.बाईत यांनी मला उदया दिनांक 25/04/2024 रोजी गाडी घेवून गुजरात येथे जाण्याकरीता सांगितल्याने, मी पुन्हा आमचे कंपनीची गाडी घेवून गुजरात येथे नवापुर मार्गे जाणार असून, तेथे आरटीओ चेक पोस्ट वर 50 ते 100 रू. इंट्री फी म्हणून तेथे हजर असणा-या आरटीओ चे अधिका-यांना लाच देण्याची कोणतीही इच्छा नाही. परंतु जर मी त्यांना 50 ते 100 रू. दिले नाहीत तर ते माझे ताब्यातील गाडी सोडणार नाहीत याची मला पुर्ण खात्री आहे. सदरचे 50 ते 100 रू. मला माझे पगाराचे रक्कमेतून दयावे लागतात.

तरी आरटीओ चेक पोस्ट, नवापुर, जि. नंदुरबार येथे हजर असणा-या आरटीओ विभागाच्या अधिका-यांविरूध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कायदेषीर कारवाई होणेकरीता लेखी तक्रार अॅन्टी करप्षन ब्युरो, ठाणे विभागास दिनांक 24/04/2024 रोजी दिली होती. तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी पंच साक्षीदार यांना बोलावून, माझे त्यांचेषी ओळख करून दिली. तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी मला आरटीओ चेक पोस्ट नवापुर बाबत विचारले असता, मी सदरचे ठिकाण आरटीओ चेक पोस्ट नवापुर हा महाराश्ट्र गुजरात सीमेवर ता. नवापुर, जि. नंदुरबार येथे असल्याचे सांगितले. तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी पोहवा परदेषी, पोहवा तारी, पोहवा सुवारे व पोना पारधी यांचेषी माझी व पंचांची ओळख करून दिली. तद्नंतर मला पोनि श्री. थोरात यांना विचारलेवरून मी दिनांक 25/04/2024 रोजी आमचे कंपनीचा आयषर कंपनीचा टेंपो क्र. एमएच 04 बीपी 6054 मधून रात्रौ 11.00 वा. निघणार असल्याचे सांगितले. त्यावेळी माझेसोबत पोहवा तारी व पोहवा सुवारे यांनी जावे व पंच, पोनि श्री. थोरात व उर्वरीत पथक हे षासकीय वाहनाने नवापुर येथे जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मी पोनि श्री. थोरात यांना सांगितले की, जर नवापुर आरटीओ चेक पोस्ट येथे षासकीय वाहनाने गेल्यास षासकीय वाहन ओळखले जावून, आरटीओ चेक पोस्ट नवापुर वरील अधिकारी व कर्मचारी लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत. म्हणून त्यावेळी पंच, पोनि श्री. थोरात व उर्वरीत पथक हे पोनि श्री. थोरात यांचे खाजगी वाहन क्र. एमएच 27 बीव्ही 1650 या मधून जाण्याचे सर्वसहमतीने ठरविण्यात आले. तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी पंचांना व उर्वरीत पथकास दिनांक 26/04/2024 रोजी सकाळी 05.00 वा. अॅन्टी करप्षन ब्युरो, ठाणे कार्यालयामध्ये येण्याच्या व माझेसोबत पोहवा सुवारे आणि पोहवा तारी यांना आमचे कंपनीचे टेंपो मधून दिनांक 25/04/2024 रोजी रात्रौ 11.00 वा. निघण्याच्या व पथकास दिनांक 26/04/2024 रोजी नवापुर येथे भेटण्याचे सुचना दिल्या. तसेच सर्वांना गोपनियता बाळगण्याचे सुचना दिल्यानंतर आम्ही अॅन्टी करप्षन ब्युरो, ठाणे कार्यालयातून निघालो होतो.

त्यानंतर मी, पोहवा सुवारे व पोहवा तारी असे दिनांक 25/04/2024 रोजी रात्रौ 11.00 वा. ठाणे येथून निघून भिवंडी बायपास, पडघा, कसारा घाट,नाषिक, दिंडोरी, हतगड, सापुतारा,अहवा मार्गे, नवापुर येथे पोहचलो व थांबून

राहिलो. त्यानंतर तेथे काहीवेळाने पोनि श्री. थोरात, पंच व उर्वरीत पथक खाजगी वाहनाने पोहचले.

त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी मला त्यांचे खाजगी वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार मी त्यांचे खाजगी वाहनामध्ये बसलो. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी पंचांना व मला सांगितले की, माझे तक्रारीची सत्यता पडताळणी करुन पुढील पडताळणी कारवाई आयोजित करण्यात येईल असे सांगून पडताळणीकरिता माझेकडे डिजीटल व्हाईस रेकार्डर देवुन, माझेसोबत पंच नं 1 श्री. तामोरे यांचेसह नवापुर आरटीओ चेक पोस्ट येथे आरटीओ चे अधिकारी किंवा कर्मचारी अथवा खाजगी इसम यांची भेट घेणेकामी पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यावेळी लाचेच्या रक्कमेबाबत बोलणी करणार असून त्यावेळी होणारे लाचेचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकाॅर्डरवरील मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे संागितले. परंतु त्यावेळी मी सांगितले की, नवापुर आरटीओ चेक पोस्ट येथे आरटीओ चे अधिकारी किंवा कर्मचारी अथवा खाजगी इसम हे लाचेची मागणी करून लागलीच लाचेची रक्कम स्विकारतात. जर त्यांना लाचेची रक्कम त्याचवेळी दिली नाही तर ते नंतर लाच स्विकारणार नाहीत. त्यावेळी पोनि श्री. थोरात व पंचांनी विचारविनिमय करून सापळापुर्व कार्यवाही पडताळणीचे अगोदर करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेवरून खाजगी वाहनामधून पोना पारधी पोहवा परदेशी यांनी तक्रारदार श्री. गायकवाड यांची अंगझडती घेतली. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी मला दिलेल्या सुचनेवरुन मी माझेकडील रक्कमेमधून 100 रू. त्यामध्ये 50 रू. दराच्या 2 नोटा पोनि श्री. थोरात यांचे समक्ष हजर केल्या. तद्नंतर पोनि श्री. थोरात यांचे सुचनेवरुन मी माझे पॅन्टचे पुढील उजवे बाजुचा खिसा रिकामा ठेवला व अंगझडतीमध्ये मिळून आलेल्या इतर चिजवस्तु त्या त्या ठिकाणी ठेवून दिल्या. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांचे सुचनेवरुन पोहवा परदेशी यांनी पंच नं 2 श्री. चैरे यांचे मदतीने मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेचे नोटांचे क्रमांक नोंदविले. तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी पोहवा परदेशी यांना लाचेची रक्कम रू. 100/- रूपये त्यामध्ये 50 रू. दराच्या 2 नोटा देऊन त्या नोटांना अॅथ्रासिन पावडर लावून त्यांचे प्रात्यक्षिक अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात मला व दोन्ही पंचाना करुन दाखविणे बाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे पोहवा परदेशी यांनी प्रात्यक्षिक दाखविले व अंथ्रासिन पावडर लागलेल्या 50 रू. दराच्या 2 चलनी नोटा असे एकुण रू. 100/- रक्कमेच्या चलनी नोटा माझे नेसुस पॅन्टचे पुढील बाजुस असलेल्या उजवे खिषात ठेवून दिल्या. त्यानंतर पोहवा परदेशी हात धुवून आल्यानंतर पोनि श्री.थोरात यांनी पोहवा परदेशी यांना पुन्हा सापळा कारवाईमध्ये सामिल करण्याचे सर्वसहमतीने ठरविण्यात आले. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेवरुन सदर खाजगी वाहनामध्ये पोहवा तारी, पोहवा सुवारे व पोना पारधी येवून बसले.

त्यानंतर पोनि श्री.थोरात यांनी मला, पंचांना व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी पोहवा सुवारे यांना डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरचे माहिती देण्यास सांगितली. त्याप्रमाणे पोहवा सुवारे यांनी मला व ंपंचांना डिजीटल रेकाॅर्डरची माहिती देवून आमचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर पडताळणी व सापळा कारवाई करणेकामी पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेवरून माझेसह माझे ताब्यातील टेंपो मधून पोहवा तारी, पोहवा सुवारे, पोना पारधी व पंच श्री. तामोरे असे रवाना झाले व पंच श्री. चैरे, पोहवा परदेशी व पोनि श्री. थोरात असे खाजगी वाहनामधून माझे टेंपोचे मागोमाग रवाना झाले. त्यानंतर मी टेंपोसह गेल्यानंतर नवापुर आरटीओ चेकपोस्ट चे अगोदर सुमारे 1 कि.मी. पुर्वी रस्त्याचे कडेला वाहन थांबविल्यानंतर पोहवा सुवारे यांनी डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर चालू केला व तो माझे षर्टचे आत अडकवून ठेवला.

त्यानंतर मी माझे ताब्यातील टेंपो घेवून नवापुर आरटीओ चेक पोस्टचे दिषेने जावून आत गेलो त्यावेळी मी वाहन प्रथम वजन काटयावर नेवून, तेथे वजन केल्यानतर नवापुर चेकपोस्ट मधील आरटीओ च्या इमारतीकडे टेंपो घेवून गेलो व त्यानंतर तेथे इमारती नजीक टेंपो थांबवून, त्यामधून मी उतरून एका खिडकी नजीक गेलो. सदर खिडकीच्या समोर बॅनर लावून आडोसा केला होता. त्यावेळी माझे मागोमाग पंच श्री. तामोरे टेंपोमधून उतरून थांबून राहिले. त्यानंतर मी लाचेच्या रक्कमेचा इषारा न करता बाहेर आलो व टेंपोमध्ये बसून, टेंपो चालू करून, चेकपोस्टचे बाहेर रस्त्यावर घेवून गेलो. चेकपोस्टचे बाहेर आल्यानंतर गुजरातचे दिषेने काही अंतर जावून, मी टेंपो रस्त्याचे कडेला थंाबविला. त्यानंतर पोहवा सुवारे यांनी माझेकडील डिजीटल रेकाॅर्डर ताब्यात घेवून तो बंद केला. त्यानंतर तेथे पोनि श्री. थोरात, पंच श्री. चैरे व पथक खाजगी वाहनामधून आले.

त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी मला पडताळणी दरम्यान काय झाले? याबाबत विचारणा केली असता, मी सांगितले की, '' मी नवापुर चेक पोस्ट येथे पंच श्री. तामोरे, पोहवा सुवारे, पोहवा तारी व पोना पारधी यांचेसह टेंपोमधून गेलो असता, तेथे वाहनांची कमी गर्दी होती. तेथे वजन काटयावर वजन केल्यानंतर मी टेंपो इमारती नजीक थांबविला, त्यामधून मी उतरून एका खिडकी नजीक गेलो. सदर खिडकीच्या समोर बॅनर लावला होता त्यामुळे आतील माणसांचा चेहरा दिसत नव्हता. त्यांचा फक्त आवाज एैकू येत होता. तेथे मी '' किती साहेब टेंपो हाय''

असे विचारले. त्यावेळी तेथे असलेल्या खाजगी इसमाने '' काय नाव हाय त्याच'' असे विचारले. त्यावर मी '' कुठे आयषर हाय'' असे सांगितले. त्यावेळी त्या इसमाने मला '' दोन तीन मानस घेवून कुठ जात होतास'' असे विचारले. त्यावर मी '' ह'' असे सांगितले. त्यावर त्या इसमाने '' दोन तीन मानस'' असे मला विचारले. त्यावर मी त्यांना '' कुठ ते क्लीनर हाय माझे सोबत '' असे सांगितले. त्यावर त्या इसमाने मला ''मे दोन क्लीनर लागतात का गाडीमध्ये'' असे विचारले. त्यानंतर त्या इसमाने मला ''ते टेंपोला क्लीनर'' असे बोलला. त्यानंतर तेथे असलेल्या अन्य इसमाने मला '' गाडी कुठेय आता.. काटा पावती दया.. काटा पावती दे काटा पावती'' असे विचारले. त्यावर मी '' काटा पावती नाय दिली'' असे सांगितले. त्यानंतर त्या दुस-या इसमाने मला '' कुठून बाहेरून आलाय'' असे विचारले. त्यावर मी त्यांना '' नाषिक वरून आलोय '' असे सांगितले. त्यानंतर तेथे असलेल्या तिस-या इसमाने मला जावा सांगितले. त्यानंतर मी तेथून निघून टेंपोमध्ये येवून बसलो. माझे मागोमाग पंच श्री. तामोरे हे टेंपोमध्ये येवून बसले व त्यानंतर आम्ही नवापुर आरटीओ चेकपोस्टचे बाहेर येवून गुजरातचे दिषेने आलो.

त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी पंच श्री. तामोरे यांना घडलेल्या घटनेच्या हकीगतीबाबत विचारणा केली असता, पंच श्री. तामोरे यांनी मी सांगितलेल्या हकीगतीप्रमाणे मिळतीजूळती हकीगत सांगितली.

त्यानंतर पेाेनि श्री. थोरात यांनी आम्हा पंचांसमक्ष डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रित झालेले संभाशण एेकले असता, ते मी सांगितलेल्या हकीगतीप्रमाणे असल्याचे पंचांची खात्री झाली. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेवरून सदरचे संभाषण डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमधील मेमरी कार्डमधील फाईल नं. 240426-002 वर ध्वनिमुद्रीत झाले असल्याची पोहवा तारी यांनी पंचांची खात्री करून दिली.

त्यानंतर मी पोनि श्री. थोरात यांना पंचांसमक्ष सांगितले की, ''मला वजन काटयावर पावती न दिल्याने, कदाचित लाचेची रक्कमेची मागणी केली नसावी. माझेकडे गुजरात मधून महाराश्ट्र मध्ये जाणा-या आरटीओ चेकपोस्टमध्ये सुध्दा पैषाची मागणी करून स्विकारली असल्याचे सांगितले.'' त्यानुसार काहीवेळाने गुजरात मधून महाराश्ट्र मध्ये जाणा-या आरटीओ चेकपोस्टमध्ये पडताळणी कारवाई करण्याचे सर्वसंमतीने ठरविण्यात आले. त्यानंतर पेाेनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही खाजगी वाहन व टेंपोने गुजरात च्या हदद्ीमध्ये सुरतचे दिषेने जावून सुमारे 15 ते 16 किं.मी अंतरावर दोन्ही वाहने कोणास संषय येणार नाही अषा रितीने थांबून राहिलो.ती वेळ 15.30 वा.ची होती.

तद्नंतर सुमारे 19.00 वा. चे सुमारास पोनि श्री. थोरात यांनी मला पंचांसमक्ष टेंपोमध्ये माल भरणेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना सांगितले की, माझे मालकाने मला गुजरात हदद्ीमध्ये पोहचून थांबून राहणेबाबत व तीथे पोहचल्यानंतर ते मला माल कोठून भरावयाचा हे सांगणार असल्याचे सांगितले होते. परंतु अदयाप मालकाचा फोन आला नाही तसेच मी मालकास फोन केला असता त्यांचा फोन लागला नाही त्यामुळे आता नवी मुंबईस परत जाण्यास हरकत नाही असे सांगितले.

त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी पंचांना, मला व पथकास सांगितले की, गुजरात मधून महाराश्ट्र मध्ये जाणा-या नवापुर आरटीओ चेकपोस्ट येथे पडताळणीची कारवाई करण्यात येईल. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी माझेसोबत पोहवा सुवारे, पोहवा तारी व पंच श्री. तामोरे यांना टेम्पो मध्ये बसण्यास सांगितले व पंच श्री. चैरे, ते स्वतः व उर्वरीत पथक असे खाजगी वाहनामधून जाणार असल्याचे संागितले. तसेच सुचनांची उजळणी केली.

त्यानंतर पडताळणी व सापळा कारवाई करणेकामी पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेवरून माझेसह माझे ताब्यातील टेंपो मधून पोहवा तारी, पोहवा सुवारे व पंच श्री. तामोरे असे रवाना झाले व पंच श्री. चैरे, पोहवा परदेषी, पोना पारधी व पोनि श्री. थोरात असे खाजगी वाहनामधून माझे टेंपोचे मागोमाग रवाना झाले. ती वेळ 19.20 ची होती. त्यानंतर मी टेंपोसह निघाल्यानंतर नवापुर आरटीओ चेकपोस्ट चे अगोदर सुमारे 1 कि.मी. पुर्वी रस्त्याचे कडेला वाहन थांबविल्यानंतर पोहवा सुवारे यांनी डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर चालू केला व तो माझे षर्टाचे आत अडकवून ठेवला. ती वेळ 19.50 वा. ची होती.

त्यानंतर पोनि श्री. थोरात यांचे सुचनेवरून त्यानंतर मी माझे ताब्यातील टेंपो घेवून नवापुर आरटीओ चेक पोस्टचे दिषेने जावून आत गेलो त्यावेळी मी माझे वाहन प्रथम वजन काटयावर नेवून, तेथे वजन करून पावती घेतल्यानंतर नवापुर चेकपोस्ट मधील आरटीओ च्या बैठया कंटेनरनजीक टेंपो घेवून गेलो व त्यानंतर तेथे टेंपो थांबवून, त्यामधून मी उतरून एका खिडकी नजीक गेलो. त्यावेळी पोहवा सुवारे, पोहवा तारी हे टेंपोमध्येच बसून राहिले होते व पंच श्री. तामोरे हे माझे मागोमाग कोणास संषय येणार नाही अषा रितीने थांबून राहिले. त्यावेळी तेथे सरकारी गणवेषातील एक अधिकारी सदर बैठया कंटेनरचे बाहेर उभे राहून बोलत असल्याचे दिसत होते. तेथे आत बसलेला इसम माझे पुढील व्यक्तीषी त्याचे गाडीबाबत बोलत होता. त्यांचे बोलणे चालू असताना, मी खिडकी जवळ जावून आत बसलेल्या इसमास माझे ड्रायव्ि‍हंग लायसन्स दिले त्यावरील माझे नांव वाचून त्याने मला 'दिपक' असे विचारले त्यावर मी

त्यास 'हं' असे बोललो. त्यावेळी आत बसलेल्या इसमाने मला त्याचे उजव्या हाताचा अंगठा त्याचे नजीकच्या बोटावर घासून इशा-याने पैशाची मागणी केली. त्यावेळी मी त्याला '' किती दयायचे साहेब'' विचारले असता, त्याने मला ''काय'' असे विचारले. त्यावर मी त्यास '' किती दयायचे असे'' पुन्हा विचारुन, ''टेम्पो हाय'' असे सांगितले. त्यावर त्या इसमाने मला त्याचे समोर असलेल्या कॅलक्युलेटर वर 50 आकडा टाईप करुन मला दर्षवून '' दया '' असे सांगितले. त्यावर मी त्यास '' पन्नास रुपये?'' असे विचारले असता, त्याने मानेने होकार दर्षविलेनंतर मी माझे पॅंटचेपुढील बाजूच्या उजव्या खिषामधून माझे उजव्या हाताने 50 रू. ची नोट काढून त्यांचे समोर धरतो. त्यावेळी त्या इसमाने माझेकडील नोट उजव्या हाताने स्विकारुन त्याचे समोरील टेबलवर ठेवली. त्यानंतर मी सदर खिडकीचे समोरुन निघून, सापळा पथकास दिसेल अषा रितीने पुर्वनियोजित इषारा केला. त्यानंतर पोहवा सुवारे हे माझे नजीक येवून मला विचारले असता, मी पन्नास रुपये असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यास पकडले त्या खिडकी समोरुन बाहेर येवून, त्यांचे खांदयावरील टाॅवेल त्यांचे डाव्या हाताने काढून त्यांचे डावे हातामध्ये धरला व लाच स्विकारण्यात आल्याचा इषारा केला.

सदर इशारा पाहताच पोहवा तारी, पोहवा सुवारे हे टेंपोमधून उतरले व पंच श्री. तामोरे यांचेसह वेगाने सदर बैठया कंटेनरचे आत गेले. त्यावेळी तेथे एक इसम खिडकी समोर बसलेला होता. त्यावेळी पोहवा तारी व पोहवा सुवारे यांनी सदर इसमाचे दोन्ही हात कषासही स्पर्ष होणार नाही अषा रितीने घट्ट पकडून ठेवले. त्यावेळी सदर इसम घाबरुन जावून पळून-जाण्याचा प्रयत्न करु लागला. परंतु त्यास अटकाव करुन धरण्यात आले होते. त्याचदरम्यान तेथे पोनि थोरात आले व त्यांनी तक्रारदार श्री. गायकवाड यांचेकडील डिजिटल रेकाॅर्डर काढून तो बंद केला. ती वेळ 20.13 वाजताची होती. त्यांनतर लागलीच पोनि श्री. थोरात यांनी मला लाचेच्या रक्कमेचा स्विकार कोणी केला याबाबत विचारणा केली असता, मी सदर बैठया कंटेनरमधील खिडकीसमोर बसलेल्या ईसमाकडे बोट करुन त्या व्यक्तीने माझेकडून लाचेच्या रक्कमेचा स्विकार केल्याचे सांगितले. तद्‌नंतर पोनि थोरात यांनी मला सदर बैठया कंटेनरचे बाहेर थांबवण्यास सांगितले. त्यानुसार मी बैठया कंटेनरचे बाहेर थांबून राहिलो.

त्यांनतर पोनि श्री. थोरात यांनी मला सदर रुममध्ये बोलावून घेतले व पोनि थोरात यांचे सूचनेवरुन सदर रुमची लाईट बंद करुन अंधारात पोना पारधी यांनी अल्ट्रा व्हाॅयलेट दिव्याच्या प्रकाशात माझे हातांची व कपडयांची तपासणी केली. माझेकडे लाचेच्या रक्कमेपैकी 50 रू. दराची 1 नोट तीचा क्रमांक 2स्ठ 013824 अषी व वजन काटा पावती व्यवहार क्र. 1031202604240782 अषी मिळून आली असून, त्याव्यतिरिक्त सापळा पूर्व कारवाईमध्ये नमूद प्रमाणे रोख रक्कम व इतर सर्व चिजवस्तू आढळून आल्या. सदर वजन काटा पावती पोनि श्री. थोरात यांनी ताब्यात घेवून, उर्वरीत सर्व चिजवस्तु मला परत करण्यात आल्या. त्यानंतर मला पुन्हा बाहेर थांबून राहण्यास सांगितले. त्यानुसार मी सदर बैठया कंटेनरच्या बाहेर थांबून राहिलो. थोडया वेळा नंतर आम्ही सर्वजण नवापूर पो.स्टे.येथे रवाना झालो.

त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी सपोनि श्री. साबळे यांना विनंती केलेवरुन, सपोनि श्री. साबळे यांनी नवापुर पोलीस ठाण्यातील एक रुम पुढील कामकाजासाठी उपलब्ध करुन दिली.

तद्‌नंतर पोनि थोरात यांनी मला सदर रुममध्ये बोलावून त्यांना घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना संपूर्ण हकीगत सांगितली. तसेच पोनि श्री. थोरात यांनी पंच श्री. तामोरे यांना घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली असता, पंच श्री. तामोरे यांनी मी सांगितलेल्या हकीगतीषी मिळतीजुळती हकीगत सांगितली.

त्यानंतर पेाॅनि श्री. थोरात यांनी पंचांसमक्ष डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रित झालेले संभाशण एॅकले असता, ते मी सांगितलेल्या हकीगतीप्रमाणे असल्याचे पंचांची खात्री झाली.

त्यानंतर पोनि थोरात यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोना पारधी यांनी पंच श्री. तामोरे, माझे मदतीने सापळा कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रित करण्यात आलेल्या संभाषणाची स्क्रिप्ट तयार केली आहे.

अषा प्रकारे खाजगी इसम श्री. इरसाल हन्नान पठाण, वय 47 वर्ष, राहणार लाखाणी पार्क, नवापुर, जि. नंदुरबार यांनी माझे ताब्यातील वाहन चेकपोस्ट वरुन सोडण्याकरीता माझेकडे 50 रू. लाचेची मागणी करुन स्विकारली, म्हणून खाजगी इसम श्री. इरसाल हन्नान पठाण, वय 47 वर्ष, राहणार लाखाणी पार्क, नवापुर, जि. नंदुरबार यांचे विरुध्द कायदेषीर फिर्याद आहे.

माझी फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असून, ती मी वाचून पाहिली, सदरची फिर्याद माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Dnyaneshwar Laxman Ware(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
नवापुर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Dnyaneshwar Laxm

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)